# मेट्रोचे सहावे भुयार उघडले

## ६९२ मीटरचा विमानतळ ते सहार रोडदरम्यानचा मार्ग १६० दिवसांत पूर्ण

मुंबई, दि. २० (प्रतिनिधी) – कुलाबा–वांद्रे–सीप्झ या 'मेट्रो–३' मार्गावरचे सहावे भुयार आज उघडले. हा संपूर्ण मार्ग भुयारी आहे. छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ ते सहार रोडदरम्यानचे भुयारीकरण आज पूर्ण झाले. दीडशे अभियंते आणि कामगारांनी १६० दिवस अथक परिश्रम घेऊन हे ६९२ मीटर लांबीचे भुयारीकरण पूर्ण केले.

मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळाने ८९ मीटर लांबीच्या 'तापी–१' या टनेल बोअरिंग मशीनच्या (टीबीएम) सहाय्याने गेल्या १३ सप्टेंबर २०१८ रोजी या भुयारीकरणाला सुरुवात केली होती. रोज ४.३१ मीटर इतक्या वेगाने हे भुयारीकरण केले गेले. मुंबईच्या भूगर्भातील ब्रेशिया आणि बेसॉल्टसारखे कठीण खडक फोडत 'तापी–१'ने ४९५ आरसीसी सिमेंट रिंग्जचा वापर करून हे भुयार तयार केले.